# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई-२१

क्र.मजीप्रा/सस/तांशा.१/३५०/ ११६४ २८ ऑक्टोबर, २००५

## परिपत्रक क्र. १०७

विषय :ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा योजनांना सुधारित प्रशासकीय मंजुरी मिळविण्याबाबत.

ग्रामीण व नागरी नळ पाणी पुरवठा योजनांवर मंजूर किंमतीपेक्षा जास्त खर्च करण्याची प्रवृत्ती क्षेत्रीय अधिका-यामध्ये वाढत असून अशाप्रकारे मंजूर किंमतीपेक्षा जास्त खर्च केल्यावर सुधारित योजनांचे प्रस्ताव ब-याच वर्षानंतर शासनाकडे पाठविले जातात. क्षेत्रीय अधिका-यांची सुधारित योजनेबाबत अशी भ्रामक समजूत आहे की, योजनेच्या एकूण मंजूर किंमतीच्या १०% पर्यंतच्या खर्चास शासनाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता नाही. आणि या समजुतीनुसार मंजूर किंमतीपेक्षा १०% किंवा रु.१ कोटी यापैकी जी कमी असेल त्यापेक्षा जादा खर्चास शासनाची पूर्वमान्यताही घेतली जात नाही अगर सुधारित योजनाही सादर केली जात नाही. त्यामुळे हा जास्तीचा खर्च इतर योजनांवर उपलब्ध असलेल्या निधीतून केला जातो. तसेच असेही निदर्शनास आले आहे की, ज्या योजनांवरील खर्च मंजुरीपेक्षा १०% पर्यंत जास्त झालेला आहे/ होणार आहे अशा योजनांना सुधारित प्रशासकीय मान्यता न घेतल्यामुळे हा जादा झालेला खर्च MPWA पोटी खर्ची पडतो किंवा पडला आहे. जोपर्यंत अशा योजनांना शासनाची सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन त्यापोटी अनुदान प्राप्त करुन घेण्यांत येत नाही तोपर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा एवढा निधी विना उपयोगी अडकून पडला आहे वा पडणार आहे.

वरील कारणामुळे योजनांना सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्यास विलंब होतो. योजनेचे कार्यान्वयन लांबणीवर पडते, योजनेचा खर्च वाढतो व या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची आर्थिक घडी बिघडून एकंदरितच सर्व योजनांच्या प्रगतीवर विपरित परिणाम होतो, तसेच लेखा परीक्षणाचे आक्षेपही येतात. वस्तुत: सुधारित योजना केव्हा व कशाप्रकारे सादर करावी याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील परिच्छेद क्र.३१२ ते ३१७ मध्ये सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. तथापि क्षेत्रीय अधिकारी याबाबत पुरेशा गांभीर्याने

→